आवक नोंद
म.सं.सं.(वि.प्र.) नाशिक - ४.

| | |
|---|---|
| अधी.अभि. | |
| स्था.अ. | |
| प्र.वि. | ५१३ |
| लेखा | |
| आ.क्र. | ५६० |
| दिनांक | ५.३.१२ |

खाजगी उपसा सिंचन योजनांना मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग,
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १०११/ ५७२/ ११/ सिंव्यधोरण
मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक - १३-२-२०१२.

प्रस्तावना -

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ दिनांक ८-६-२००५ पासून अंमलात आला आहे.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ कलम १२ (६) (घ) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

अस्तित्वात असलेल्या खाजगी उपसा सिंचनाचे व्यवस्थापन, पाण्याचा कार्यक्षम वापर करण्याच्या अटीवर, पाच वर्षे चालू ठेवण्यात येईल. त्यानंतर शासन विनिर्दिष्ट करील अशा दिनांकापासून कलम १४ (४) मधील तरतूदी लागू होतील.

परंतु असे की, वेगवेगळ्या क्षेत्राकरिता भौगोलिक परिस्थितीनुसार वेगवेगळे दिनांक अधिसूचित करता येतील.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ कलम १४ (४) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

निर्धारित केला जाईल अशा भागातील बारमाही पिकांना निर्धारित केला जाईल अशा दिनांकापासून, ठिबक सिंचन, तुषार सिंचन अथवा प्राधिकरणाने मान्यता दिलेले अन्य पाण्याची बचत करणारे तंत्र वापरल्याखेरीज कालव्यामधून पाणी दिले जाणार नाही. या बचतीमधून भविष्यातील वाढीव पिण्याच्या पाण्याची मागणी भागवून शिल्लक राहिलेले पाणी लाभक्षेत्रातील तसेच लगतच्या भागात समन्यायी तत्वावर वाटप करण्यात येईल.

राज्यात ब-याच खाजगी उपसा सिंचन योजनांना, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ अंमलात येण्यापूर्वी पाणीपरवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ कलम १२ (६) (घ) नुसार, खाजगी उपसा सिंचन योजना सुरु ठेवण्याची मुदत दिनांक ७-६-२०१० रोजी जरी संपली असली तरी, राज्यात फार मोठया प्रमाणावर खाजगी उपसा सिंचन योजना कार्यान्वित आहेत, असे निदर्शनास आले होते. त्यामुळे खाजगी उपसा सिंचन योजनांना, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ कलम १४ (४) मधील तरतूद लागू करण्यासाठी दिनांक विनिर्दिष्ट करण्याचा, अथवा खाजगी उपसा सिंचन योजनांना, दिनांक ७-६-२०१० रोजीनंतरच्या पुढील कालावधीसाठी मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

[कृ.मा.प.

**शासन निर्णय -**

शासनाने प्रस्तुत प्रस्तावाबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ कलम १२ (६) (घ) मधील तरतूदीनुसार, शेतक-यांच्या हितासाठी, खाजगी उपसा सिंचन योजनांना, दिनांक ८-६-२०१० पासून दिनांक ७-६-२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ कलम १२ (६) (घ) मध्ये नमूद केल्यानुसार, पाण्याचा कार्यक्षम वापर करण्याच्या अटीवर, खाजगी उपसा सिंचन योजनांना ही मुदतवाढ देण्यात येत आहे. यासाठी या संस्थांनी ठिबक सिंचन, तुषार सिंचन अथवा महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने मान्यता दिलेले अन्य पाण्याची बचत करणारे तंत्र वापरणे आवश्यक आहे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१२०२१३०९०९१६२१६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सं. दे. कुलकर्णी)
शासनाचे उप सचिव.

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव.
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव.
मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव.
मा. मंत्री, जलसंपदा (कृखोपाम वगळून) यांचे खाजगी सचिव.
मा. मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) यांचे खाजगी सचिव.
उर्वरित सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव.
मा. राज्यमंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव.
उर्वरित सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल (लेखापरिक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल (लेखापरिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
सचिव, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई.
मुख्य सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग.
प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व मुख्य अभियंता व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व अवर सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग.
सर्व महसंचालक, जलसंपदा विभाग.
सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
निवडनस्ती कार्यासन सिव्यधोरण.

कार्यालय
अधीक्षक अभियंता,
म. ज. सं. (वि. गृ.)
नाशिक - ४
१२.३.१२

अ.अ. (वि.गृ.) यांचे करिता
मजसं, नाशिक-४